MHRG170058712019

## नियमित दिवाणी अपील क्रमांक ३३८/२०१९

## निशाणी क्र. ३७ वरील आदेश

१. सदर अपीलातील अपिलार्थी क्र.१ शांताबाई महादू घरत हया दिनांक २६/०६/२०२४ रोजी मयत झाल्या आहेत व त्यांना अपिलार्थी क्र.२ ते ७ हेच वारस असल्यामुळे अपिलाच्या सरनाम्यात अपिलार्थी क्र.१ च्या नावापुढे मयत तर्फे वारस अपिलार्थी क्र.२ ते ७ अशी दुरुस्ती होणेकरिता प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

२. उत्तरार्थी क्र.२ ते १२ यांनी प्रस्तुत अर्ज मंजूर करणे नाहरकत दर्शविली. तथापि, उत्तरार्थी क्र.२० यांनी प्रस्तुत अर्ज मंजूर करणेस हरकत नोंदविली.

३. अर्ज, म्हणणे व अभिलेखावरील कागदपत्रे पाहिली. उभयपक्षांचा युक्तिवाद ऐकला. अपिलार्थी क्र.१ शांताबाई महादू घरत हया दिनांक २६/०६/२०२४ रोजी मयत झाल्या आहेत. त्यांच्या मृत्यू प्रमाणपत्राची पडताळलेली प्रत सोबत दाखल केली आहे. सदर मयत अपिलार्थी क्र.१ शांताबाई महादू घरत यांचे अपिलार्थी क्र.२ ते ७ हेच वारस असल्यामुळे अपिलाच्या सरनाम्यात अपिलार्थी क्र.१ च्या नावापुढे मयत तर्फे वारस अपिलार्थी क्र.२ ते ७ अशी दुरुस्ती करणे न्यायोचित ठरते. त्यामुळे मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

### आदेश

१. अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. अपिलार्थी यांनी अर्जात नमूद केल्याप्रमाणे दुरुस्ती आदेशापासून १४ दिवसांत अपिल मेमोमध्ये करावी.

SANTOSH RAMU CHAVAN

Digitally signed by SANTOSH RAMU CHAVAN
Date: 2026.04.23 16:57:37 +0530

**पनवेल.**

**दिनांक २३/०४/२०२६**

**(संतोष रा. चव्हाण)**
**जिल्हा न्यायाधीश–३,**
**पनवेल–रायगड.**

MHRG170058712019

# नियमित दिवाणी अपील क्रमांक ३३८/२०१९

## निशाणी क्र. ५२ वरील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी उत्तरार्थी/मुळ प्रतिवादी क्र.१३ ते ३० यांची नावे दाव्यातून व अपिलातून कमी करणेसाठी दाखल केलेला आहे.

२. उत्तरार्थी क्र.२ ते १२ यांनी प्रस्तुत अर्ज मंजूर करणे नाहरकत दर्शविली.

३. अर्ज, म्हणणे व अभिलेखावरील कागदपत्रे पाहिली. उभयपक्षांचा युक्तिवाद ऐकला. अपिलार्थी व उत्तरार्थी क्र. २ ते १२ यांची आपसात तडजोड झालेली आहे असे कथन केले आहे. त्यांना उत्तरार्थी/ मुळ प्रतिवादी क्र.१३ ते ३० यांचेविरुध्द सदर अपिल चालवणेचे नसल्याचे सांगितले. त्यामुळे अपिलार्थी यांनी मागितलेली दुरुस्ती मंजूर करणे न्यायोचित ठरते. त्यामुळे मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

### आदेश

१. अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. अपिलार्थी यांनी अर्जात नमूद केल्याप्रमाणे दुरुस्ती आदेशापासून १४ दिवसांत अपिल मेमोमध्ये करावी.

SANTOSH RAMU CHAVAN

Digitally signed by SANTOSH RAMU CHAVAN
Date: 2026.04.23 16:57:46 +0530

पनवेल.
दिनांक २३/०४/२०२६

(संतोष रा. चव्हाण)
जिल्हा न्यायाधीश–३,
पनवेल–रायगड.

MHRG170058712019

## नियमित दिवाणी अपील क्रमांक ३३८/२०१९

## निशाणी क्र. ४२, ४४ व ४६ वरील एकत्रीत आदेश

१. सदर अपीलातील अपिलार्थी यांनी प्रस्तुतचा अर्ज मयत उत्तरार्थी क्र.७ नामदेव रामा घरत यांचे वारस अभिलेखावर घेणेसाठी झालेला विलंब माफ होवून त्यांचे वारस रेकार्डवर घेणेसाठी व अबेटमेंट रद्द करणेसाठी सादर केला आहे.

२. अर्ज कथन थोडक्यात असे की, उत्तरार्थी क्र.७ नामदेव रामा घरत हे दिनांक १८/०१/२०२४ रोजी मयत झाले आहेत. अपिलार्थी यांनी मयत उत्तरार्थी क्र.७ चे वारस रेकॉर्डवर घेणेसाठी जाणीवपूर्वक विलंब केलेला नाही.

३. सदर अर्जास उत्तरार्थी क्र.२ ते १२ यांनी म्हणणे देवून सदर अर्जास नाहरकत दर्शविली. सदर अपील गुणवत्तेवर चालणेकरिता मयत उत्तरार्थी क्र.७ यांचे वारस हे प्रस्तावित उत्तरार्थी क्र.७/१ ते ७/५ यांना अपिलामध्ये सामील करुन घेणे न्यायोचित ठरेल. त्यामुळे मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज नि. ४२, ४४ व ४६ मंजूर करणेत येतात.
२. विलंब माफ करण्यात येत आहे.
३. उत्तरार्थी क्र.७ विरुध्दचा अबेटमेंट रद्द करण्यात येत आहे.
४. उत्तरार्थी क्र.७ चे वारस अभिलेखावर घेणेस परवानगी देणेत येते व त्यानुसार अपिलार्थी यांनी सदर आदेशापासून १४ दिवसांत अपिल मेमोमध्ये योग्य ती दुरुस्ती करावी.

SANTOSH RAMU CHAVAN

Digitally signed by SANTOSH RAMU CHAVAN
Date: 2026.04.23 16:57:53 +0530

पनवेल.
दिनांक २३/०४/२०२६

(संतोष रा. चव्हाण)
जिल्हा न्यायाधीश-३,
पनवेल-रायगड.